| | |
|---|---|
| **CNR NO.MHSN170041432020** | दाखल दिनांक – ०७.०१.२०२१<br>नोंदणी दिनांक – ०७.०१.२०२१<br>निकाल दिनांक – ३०.०३.२०२६<br>कालावधी – वर्ष महिने दिवस<br>०५ ०२ २३ |

**विटा येथील अतिरीक्त सत्र न्यायाधीश, विटा यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – उषा वि. इंदापुरे)**

**विशेष खटला क्र. १५०/२०२४**
**(जुना विशेष खटला क्रं.१३/२०२१)**

**निशाणी – ९२**

**नमुना–अ**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | महाराष्ट्र शासनतर्फे पी. आय. पोलीस स्टेशन, चिंचणी वांगी जि. सांगली. |
| **उपस्थिती** | सरकारतर्फे अति. सरकारी अभियोक्ता,<br>श्री. एम. बी. कुलकर्णी |
| **आरोपी** | **१. वसंत बाजीराव मोरे,**<br>वय– ७५ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>रा. देवराष्ट्रे, ता. कडेगांव, जिल्हा–सांगली.<br><br>**२. विशाल वसंत मोरे,**<br>वय– २७ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>रा. देवराष्ट्रे, ता. कडेगांव, जिल्हा–सांगली. |
| **उपस्थिती** | आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जी. जी. लाड. |

## नमुना–ब

| | |
|---|---|
| घटना दिनांक | २४.०९.२०२० |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २४.१०.२०२० |
| दोषारोप दिनांक | २२.०१.२०२१ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २१.०२.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | – |
| न्यायनिर्णय तारीख | ३०.०३.२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर असेल तर | लागू नाही. |

## नमुना–क

| अ. क्रं. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन वर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये आरोपी किती दिवस तुरुंगामध्ये राहिले होते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वसंत बाजीराव मोरे | ०२/११/२०२० | ११/११/२०२० | भा. द. वि. कलम ३२३,५०४, ५०६, ४२७ सह कलम ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध सुधारीत) कायदा कलम ३ (१)(r)(s)व ३(२) (व्हीए) अन्वये | निर्दोष मुक्त | नाही | लागू नाही. |
| २. | विशाल वसंत मोरे | ०२/११/२०२० | ११/११/२०२० | भा. द. वि. कलम ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती | निर्दोष मुक्त | नाही | लागू नाही. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (अत्याचार प्रतिबंध सुधारीत) कायदा कलम ३(१)(r)(s) व ३(२)(व्हीए) अन्वये | | | |

## <u>नमुना–ड</u>

### <u>अ– सरकारपक्षातर्फे साक्षीदार</u>

| अ.क्र | साक्षीदाराचे नाव | निशाणी | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | अशोक बाळू मिसाळ | २५ | फिर्यादी |
| २. | बाळाताई अशोक मिसाळ | ३७ | साक्षीदार |
| ३. | मनिषा शामराव मिसाळ | ४० | साक्षीदार |
| ४. | संगिता तानाजी मिसाळ | ४५ | साक्षीदार |
| ५. | लता आप्पासाहेब निंबाळकर | ६३ | स्वतंत्र साक्षीदार |
| ६. | अंकुश दादासाहेब इंगळे | ७४ | तपास अधिकारी. |

### <u>ब– बचावपक्षातर्फे साक्षीदार</u>

| अनु.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| ––– | ––––– | ––––– |

### <u>क– न्यायालयातर्फे साक्षीदार</u>

| अनु.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| ––– | ––––– | ––––– |

## सरकारपक्ष / बचावपक्ष / कोर्ट तर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी–अ– सरकारपक्षातर्फे

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३४ (स.सा.क्र.१) | फिर्याद. |
| २. | ३८ ( बचावपक्षाने मान्य केला) | घटनास्थळ पंचनामा. |
| ३. | ६६(स.सा.क्र.५) | विठ्ठल मोरे याचा शाळा सोडल्याचा दाखला. |
| ४. | ७० (बचाव पक्षाने मान्य केला) | अशोक मिसाळ याच्या जातीचा दाखला. |
| ५. | ७५ (स.सा.क्र.६) | तपास करण्याबाबत दिलेला पोलीस अधिक्षक यांचा आदेश. |
| ६. | ७६ (स.सा.क्र.६) | मंडल अधिकारी, देवराष्ट्रे यांना दिलेले पत्र. |
| ७. | ७७ (बचाव पक्षाने मान्य केला) | घटनास्थळाचा नकाशा. |
| ८. | ७८ (स.सा.क्र.६) | गॅझेटची प्रत. |
| ९. | ७९ (स.सा.क्र.६) | ग्रामविकास अधिकारी देवराष्ट्रे यांना दिलेले पत्र. |
| १० | ८० (स.सा.क्र.६) | नमूना ८ चा उतारा. |

## ब–बचावपक्षातर्फे

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ––– | ––––– | ––––– |

## क– न्यायालयातर्फे

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

## ड– मुद्देमालाचे वर्णन

| अनु.क्रं. | मुद्देमालाचा क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | ––––– | ––––– |

## – न्या य नि र्ण य –
## (पारीत केला दिनांक ३० मार्च २०२६)

आरोपी क्र. १ व २ यांचेविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२३, ५०४, ५०६ सह ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध सुधारीत) कायदा २०१५ कलम ३(१)(r)(s) व ३(२)(व्हीए) अन्वये सदरचा खटला दाखल केला आहे.

**सरकारपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. वर्दीजबाब देणारा हा हिंदू मांतग समाजाचा असून आरोपी हे मराठा समाजाचे आहेत. आरोपींना वर्दीजबाब देणाऱ्याच्या जातीची माहीती आहे. वर्दीजबाब देणाऱ्याचा चुलता उत्तम बापू मिसाळ याच्या नावे असलेली गट क्र. ११३/१० मधील १७ गुंठे क्षेत्र वसंत मोरे याचे वडील बाजीराव मोरे यांनी उत्तम मिसाळ यांची फसवणूक करुन ३० वर्षापूर्वी खरेदी घेतली होती. इंदिरा आवास घरकुल योजनेतून मिळालेल्या शासकीय अनुदानातून त्या क्षेत्रात वर्दीजबाब देणारा, त्याचा चुलत भाऊ तानाजी मिसाळ, मधुकर मिसाळ, शंकर मिसाळ व हिराबाई मिसाळ यांनी घरे बांधून, ते सर्वजण तेथे रहात आहेत.

दि.२४.१०.२०२० रोजी वर्दीजबाब देणारा व त्याचे वर नमूद नातेवाईक यांना पोलिस ठाण्यात बोलविले होते. पोलिस अधिक्षक, सांगली यांच्याकडे त्या सर्वांनी दिलेल्या तक्रारी अर्जाबाबतची चौकशी पोलिसांनी त्यांच्याकडे केली. वर्दीजबाब देणाऱ्याने सांगितले की, त्याची पत्नी बाळाताई कामानिमित्त परगावी गेल्यामुळे तो पोलिस ठाण्यात हजर राहिला.

३. दिनांक २४/०९/२०२० रोजी रात्री १०:३० च्या सुमारास ते रहात असलेल्या वर नमूद जागेत आरोपी वसंत बाजीराव मोरे व त्याचा मुलगा विशाल वसंत मोरे तेथे आले व म्हणाले की, "तुम्ही रहात असलेली जागा आमची आहे, तेव्हा तुम्ही येथून निघून जा, अन्यथा जेसीबी लावून रातोरात घरे पाडून सपाट करणार आहे, या जागेत कोणीही मांगाचे रहायचे नाही. मांगट्यानो याची दखल घ्या, नाहीतर एका एकाला संपविल्याशिवाय आम्ही राहणार नाही, आमचे कितीही पैसे जाऊ देत, पाच एकर जमिन विकायला लागली तरी चालेल, एकाही मांगाला जिवंत सोडणार नाही". आरोपींनी शिवीगाळ केली व त्याच्या पत्नीला धक्काबुक्की करुन चिखलात लोळविले, त्याचा पुतण्या सनी गजानन मिसाळ यालाही चिखलात लोळवून भिंतीवर ढकलून दिले. या भांडणात त्याची पत्नी बाळाताई हिचे झंप्पर फाटून तिच्या गळयातील अर्धा तोळयाचे मनीमंगळसुत्र तुटून नुकसान केले आहे. सदरचे भांडण सोडविण्यास वर्दीजबाब देणारा, त्याची भावजय मनिषा शामराव मिसाळ, वर्षा गजानन मिसाळ व संगीता तानाजी मिसाळ गेले तेव्हा आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ करुन मध्ये आला तर सोडणार नाही अशी धमकी दिली. त्या अर्जाच्या अनुषंगाने चौकशीकरीता बोलविल्यामुळे दिनांक २४/१०/२०२० रोजी वर्दी जबाब देणाऱ्याने पोलिस स्टेशन चिंचणी वांगी येथे त्या घटनेबाबत फिर्याद दिली.

४. वर्दीजबाब देणा–याचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, चिंचणी

वांगी येथे गुन्हा रजि. नं. १०३/२०२०, भारतीय दंड संहिता कलम ३२३, ५०४, ५०६ सह ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा कलम ३(१)(r)(s) व ३(२)(व्हीए) अन्वयेचा गुन्हा दाखल झाला. सदरच्या प्रकरणाचा तपास उप–विभागीय पोलीस अधिकारी अंकुश इंगळे यांनी केला. तपासकामी त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

५. सरकारपक्षातर्फे दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करुन आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा कलम ३(१)(r)(s) व ३(२)(व्हीए) चे दोषारोप (नि.क्र.१३) माझे पूर्वाधिकारी यांनी नोंदविला. आरोपींना सदरचे दोषारोप वाचुन दाखविले व त्यांच्या भाषेत समजावुन सांगितले. आरोपींनी त्यांच्यावर तोहमत केलेले गुन्हे नाकबुल केले व खटला पुढे चालविण्याची विनंती केली. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(बी) अन्वये आरोपींची निवेदने नि.क्र.८४ व ८५ अन्वये नोंदविण्यात आली.

६. सरकारपक्षाच्या कथनावरून खालील मुद्दे माझे विचारार्थी उपस्थित होतात. सदरचे मुद्दे व त्यावर माझे कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २४.०९.२०२० रोजी रात्री १०.३० वाजता मौजे देवराष्ट्रे, ता. कडेगाव, जिल्हा सांगली येथे आरोपींनी समान उद्देश साध्य करण्याकरिता वर्दीजबाब देणारा व साक्षीदारांना इच्छापूर्वक दूखापत पोहोचविल्याचे सरकारपक्षाने शाबित केले आहे काय ? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्वेश साध्य करण्याकरिता वर्दीजबाब देणारा व साक्षीदार यांना प्रक्षोभित करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांतताभंग व्हावा अथवा कोणताही अपराध घडावा या उद्वेशाने वर्दीजबाब देणारा व साक्षीदारांचा अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केल्याचे सरकारपक्षाने शाबित केले आहे काय ? | नकारार्थी. |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्वेश साध्य करण्याकरिता वर्दीजबाब देणारा व साक्षीदार यांना फौजदारीपात्र धाकदपटशा केल्याचे सरकारपक्षाने शाबित केले आहे काय ? | नकारार्थी. |
| ४. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्वेश साध्य करण्याकरिता वर्दीजबाब देणाऱ्याच्या पत्नीच्या गळयातील अर्धा तोळयाचे मनीमंगळसुत्र तोडून रक्कम रुपये ५० पेक्षा जास्त रक्कमेचे नुकसान करुन आगळीक केल्याचे सरकारपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नकारार्थी. |
| ५. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्दीष्ठ साध्य करण्याकरिता वर्दीजबाब देणारा व साक्षीदार यांची जात माहीत असताना त्यांना धाकदपटशा दाखवून जातीवाचक शिवीगाळ "तुम्ही मांगानी येथे राहायचे नाही, मांगट्यानो याची दखल घ्या, नाहीतर एका एकास संपविल्याशिवाय राहणार नाही " असे म्हणून वर्दीजबाब देणारा व साक्षीदारांचा हेतूपुरस्सर जातीवाचक शिवीगाळ करुन अपमान केल्याचे सरकारपक्षाने शाबित केले आहे काय ? | नकारार्थी. |
| ६. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ६ करीता –**

७. पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदरचे सर्व मुद्दे एकत्रीत विचारात घेण्यात आले आहेत.

८. अशोक (स.सा.क्र.१) याने सरतपासात सांगितले की, तो हिंदू मांग समाजाचा व आरोपी मराठा समाजाचे आहेत. त्याने चिंचणी पोलिस ठाण्यात लेखी तक्रार अर्ज दिला होता, त्यात त्याने नमूद केले होते की, आरोपींनी त्यांची घरे जेसीबीच्या सहाय्याने पाडून टाकण्याची त्यांना धमकी दिली व मांगट्यानो तुम्हाला इथे ठेवणार नाही, अशी जातीवाचक शिवीगाळ केली. त्या अर्जात असेही नमूद केले की, त्यांचे दोन एकर क्षेत्र विकावे लागले तरी ते आम्हाला जिवंत ठेवणार नाहीत. घटनास्थळ हे देवराष्ट्रे गावातील गट क्र.११३/१० असून ती घरे इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधलेली आहेत. आरोपींनी त्याच्या पत्नीला व पुतण्या सनी यांना चिखलात लोळविले व त्या भांडणात त्याच्या पत्नीचे झंप्पर फाटले व तिच्या गळ्यातील मंगळसुत्र तुटले. त्याच्या घरापासून २०० मीटर अंतरावर दोनही आरोपी राहतात.

९. साक्षीदाराने उलटतपास मान्य केले आहे की, पोलिस अधिक्षक यांच्याकडे दिलेल्या अर्जाची पोहोच त्याला देण्यात आली नव्हती. त्याला मराठी भाषा वाचता येत नाही व त्याने फिर्याद वाचून पाहिली नव्हती. जमिन गट क्र. ११३/१० च्या ७/१२ उताऱ्यावर वसंत मोरे याचे नाव आहे व वसंत मोरे याने त्याच्या गट क्र. ११३/१० मधील कब्जाला अडथळा करत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द विटा न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. ६३/२००१ दाखल केला होता. त्या दाव्यात त्यांनी लेखी कैफियत दिली होती. गट क्र. ११३/१० ही

जमिन आजही त्याला मिळावी असे वाटते असेही त्याने मान्य केले आहे.

**१०.** बाळाताई (स.सा.क्र.२) हिने पुराव्यात सांगितले की, ती मांग समाजाची असून आरोपी त्यांच्याच गावात शेजारी राहतात व मराठा समाजाचे आहेत. आरोपींना त्यांच्या समाजाची माहीती आहे. दिनांक २४/०९/२०२० रोजी रात्री १०:३० वाजता आरोपींनी भांडण काढले. ती, तिचा पती व पुतण्या जेवण करत होते. आरोपी वसंत म्हणाला, मांगट्या घरातून बाहेर व्हा व एक एकाला मारीन. आरोपी म्हणाले, एकेकाला ठेवणार नाही, माझे पाच एकर रान गेले तर चालेल, घर जेसीबीने पाडेन मांगट्यानो. त्या दोघांनी तिचे झंप्पर फाडले व गळ्यातील मणीमंगळसुत्र तोडले.

**११.** साक्षीदार हिने उलटतपास मान्य केले आहे की, जमिनीवरुन आरोपी व त्यांच्यात वाद आहे. मनिषा मिसाळ तिची जाऊ आहे. तिची चिखलाने भरलेली साडी व फाटलेले झंप्पर सप्टेंबर महिन्यात पोलिसांना दिले होते व पोलिसांनी घेतले होते. त्या सर्वांनी सांगितलेली घटना दिनांक २५/०९/२०२० रोजी पोलिसांनी लिहून घेतली. पूर्वी ती दोन वेळा पोलिस स्टेशनला गेली होती, परंतु दिनांक २४/०९/२०२० नंतर ती पोलिस स्टेशनला गेली नाही.

**१२.** मनिषा (स.सा.क्र.३) सरतपासात सांगते की, उत्तम मिसाळ तिचे चुलत सासरे असून जमिन गट क्र. ११३/१० क्षेत्र १७ गुंठे आरोपी क्र. १ चे वडील बाजीराव यांनी उत्तम मिसाळ याची फसवणूक करुन घेतली. या जमिनीवर सरकारी योजनेतील घरे बांधलेली असून तेथे ते सर्वजण राहतात. दिनांक २४/०९/२०२० रोजी रात्री १०:३० वाजता ती घरात असताना भांडणाचा आवाज ऐकून ती तिची जाऊ संगिता घराबाहेर आले. त्या ठिकाणी दोनही आरोपी, बाळाताई व तिचा मुलगा विशाल दिसले. आरोपी म्हणाले "मांगट्याने

इथून बाहेर व्हा व रातोरात जेसीबी लावून घरे पाडून टाकू व कितीही पैसे जाऊ देत तुम्हाला इथे ठेवणार नाही, मांगाना ठेवणार नाही, एक एकर जमिन गेली तरी चालेल". आरोपींनी बाळाताईला चिखलात पाडले व तिचा मुलगा सनी याला चिखलात पाडून भिंतीवर ढकलले. त्यावेळेस बाळाताईचा झंप्पर फाटला व तिच्या गळ्यातील मंगळसुत्र चिखलात तुटून पडले.

**१३.** साक्षीदार हिने उलटतपासात सांगितले की, पोलिसांनी चिखलाने भरलेले कपडे त्यांच्याकडून जमा करुन घेतले नव्हते. तिने पुन्हा सांगितले, कपडे व मंगळसुत्र पोलिसांनी जमा करुन घेतले किंवा नाही हे तिला माहीत नाही. तिचा जबाब पोलिसांनी दिनांक २५/१०/२०२० रोजी लिहला.

**१४.** संगिता (स.सा.क्र.४) सरतपासात सांगते की, वर्दीजबाब देणारा अशोक तिचा चुलत दीर असून आरोपींना ती ओळखते. आरोपी मराठा समाजाचे व वर्दी जबाब देणारा मांग जातीचा असून वर्दीजबाब देणाऱ्याची जात आरोपींना माहीत आहे. तिचे चुलत सासरे उत्तम यांची गट क्र. ११३/१० मधील १७ गुंठे जमिन आरोपी वसंतचे वडिल बाजीराव यांनी उत्तम मिसाळ यांना फसवून घेतली. दोनही आरोपी त्यांच्या शेजारी राहतात. इंदिरा आवास योजनेतील सरकारी घरे गट क्र. ११३/१० मध्ये त्यांना मिळाली व ते तेथेच राहतात.

**१५.** तिने पुराव्यात असेही सांगितले की, चार ते पाच वर्षापूर्वी रात्री १०:०० वाजता ती घरात असताना भांडणाचा आवाज आल्यामुळे ती, तिचा पती, सुन व मुले घराबाहेर पाठीमागे बाळाताईच्या घरी गेले. आरोपी हे बाळाताईला मारहाण व धक्काबुक्की करत होते. दोनही आरोपी बाळाताईला म्हणाले, मांगानो येथे राहायचे नाही व मांगट्यानो तुम्ही येथे राहायचे नाही व ही जागा माझी आहे. ते असेही म्हणाले तुम्ही येथे राहायचे नाही व तुम्हाला मारेन व जेसीबीने घरे पाडीन

व माझी पाच एकर जमिन गेली तरी चालेल तुम्हाला ठेवणार नाही व जिवंत सोडणार नाही. बाळाबाईचे झंप्पर फाडले, तिच्या गळ्यातील मंगळसूत्र तुटले, ते सापडले नाही. आरोपींनी बाळाबाईला मारहाण केली व चिखलात लोळविले. सनीला देखील चिखलात लोळवले व भिताडावर आपटले.

**१६.** साक्षीदार हिने उलटतपासात मान्य केले आहे की, सदर जमिनीविषयी आरोपी व त्यांच्यात वाद होते. बाळाबाईचे मंगळसुत्र व फाटलेले कपडे पोलिसांनी जप्त केले किंवा नाही याची तिला माहीती नाही.

**१७.** लता (स.सा.क्र.५) सरतपासात सांगते की, दिनांक १५/०७/२०१५ रोजी भारती विद्यापीठ इन्टीटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्नीक) पलूस येथे कनिष्ठ लिपीक म्हणून ती कार्यरत होती. विठ्ठल वसंत मोरे हिंदू-मराठा असून त्याची जन्मतारीख ३०/१२/१९९२ अशी जनरल रजिष्टरच्या अ.क्र.९१६ वर नोंदविली आहे. त्याला शाळा सोडल्याचा दाखला क्रमांक १२३५ तिने दिला होता. त्या दाखल्यातील सर्व मजकूर मुळ जनरल रजिष्टर मधील नोंदीप्रमाणे बरोबर आहे.

**१८.** साक्षीदार हिने उलटतपासात मान्य केले आहे की, जनरल रजिष्टरमधील अ.क्र.९१६ वरील नोंद तिच्या नेमणूकीच्या काळातील नसल्यामुळे त्या नोंदी कोणी घेतल्या हे ती सांगू शकत नाही. तसेच त्या नोंदी कशाच्या आधारे घेतल्या त्याबाबतचा मजकूर जनरल रजिष्टरमध्ये नमूद केला नाही. निशाणी ६६ चा शाळा सोडल्याचा दाखला हा जातीचा दाखला नाही.

**१९.** अंकूश (स.सा.क्र.६) तपास अधिकारी असून तपास कामी केलेल्या कारवाईबाबत सरतपासात सांगितले आहे. साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले आहे की, आरोपी क्र. १ च्या वडिलांनी फिर्यादीच्या चुलत्याची फसवणूक करुन

गट क्र. ११३/१० ची जमिन घेतल्याचे तपास कामी निदर्शनास आले नाही. घटनास्थळाच्या आजूबाजूला वस्ती व राहती घरे आहेत. फिर्यादीची पत्नी व पुतण्याचे कपडे तपास कामी जप्त केले नाहीत. सदरच्या प्रकरणात पहिली दखलपात्र माहीती दिनांक २४/१०/२०२० रोजी प्राप्त झाली व त्यापूर्वी साक्षीदार हा घटनास्थळी गेला नव्हता व साक्षीदारांचे जबाब नोंदविले नव्हते. साक्षीदार बाळाताई हिने सप्टेंबर महिन्यात तिची चिखलाने माखलेली साडी व फाटलेला झंप्पर दिला असा प्रकार घडला नाही.

२०. सरकारपक्षातर्फे सरकारी वकील श्री. एम. बी. कुलकर्णी यांनी युक्तीवाद केला की, आरोपी हे गावातील व वर्दीजबाब देणाऱ्याच्या शेजारी रहात असल्यामुळे आरोपींना वर्दीजबाब देणाऱ्याची जात माहीत आहे. वर्दीजबाब देणारा व सरकारपक्षाचे साक्षीदार क्र. २ ते ४ यांनी त्यांचे पुराव्यात संपूर्ण घटना सांगितली आहे. वर्दीजबाब देणारा व साक्षीदारांना आरोपींनी साक्षीदारांचे समक्ष जातीवाचक शिवीगाळ केल्याचे सरकारपक्षाने संशयरहीत शाबीत केले आहे. आरोपीचा शाळा सोडल्याचा दाखला सिध्द केला आहे. त्यावरुन आरोपी हा मराठा समाजाचा आहे ही बाब सिध्द झाली आहे. वर्दीजबाब देणारा मांग जातीचा असल्याचे जातीचे प्रमाणपत्र सरकारपक्षाने दाखल केले असून बचावपक्षाने मान्य केल्यामुळे वर्दीजबाब देणारा हा मांग जातीचा असल्याचेही सिध्द झाले आहे. सरकारपक्षाच्या सर्व साक्षीदारांचा पुरावा विश्वासार्ह असल्यामुळे आरोपींनी गुन्हा केल्याचे सिध्द झाले आहे. सबब, आरोपींना कडक शासन व्हावे.

२१. आरोपींतर्फे श्री.जी.जी.लाड वकीलांनी युक्तीवाद केला की, सरकारपक्षाचे साक्षीदार क्र. २ ते ४ हे वर्दीजबाब देणाऱ्याचे जवळचे नातेवाईक आहेत व ते त्रयस्थ किंवा स्वतंत्र साक्षीदार नाहीत. अनुसूचित जाती/जमाती कायद्यातर्गत ज्या साक्षीदारांचा पुरावा देणे आवश्यक आहे त्या साक्षीदारांचा पुरावा

दिलेला नाही. पोलिस अधिक्षक यांच्याकडे दिलेला दिनांक २४/०९/२०२० चा अर्ज तपास अधिकारी यांनी हस्तगत केला नाही. ज्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २४/१०/२०२० रोजी वर्दीजबाब देण्यात आला तो मुळ अर्ज अथवा त्याची प्रत अभिलेखात दाखल नसल्यामुळे, त्या अर्जात कोणता मजकूर लिहीला होता, याचा खुलासा झालेला नाही. त्यामुळे त्याच घटनेच्या अनुषंगाने वर्दीजबाब दिला होता, असा निष्कर्ष काढता येत नाही. गट क्र. ११३/१० च्या मिळकतीवर शासकीय योजने अंतर्गत घरे बांधल्याबाबतचा कोणताही पुरावा तपास अधिकारी यांनी प्राप्त केला नाही व सरकारपक्षाने तो पुरावा अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न केला नाही. वर्दीजबाब देणारा, त्याचे नातेवाईक व आरोपी यांच्यात जमिनीच्या कारणावरुन वाद आहे. वर्दीजबाब देणारा हा आरोपींना वारंवार जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या कारणावरुन केस दाखल करण्याची धमकी देतो व तशी त्याने घटना घडली नसताना सदरची केस दाखल केली असल्यामुळे त्याच्या पुरावावर विश्वास ठेवता येणार नाही. आरोपीच्या नावे असलेली जमीन वर्दीजबाब देणाऱ्याला पाहिजे असल्यामुळे आरोपींवर त्याचा राग आहे. बचाव पक्षातर्फे खालील न्यायनिवाडयांचे संदर्भ दिले.

**Hutu Ansari Alias Futu Ansar and Vs. State of Jharkhand, AIR 2025 SC (Criminal) 927,** wherein the Hon'ble Apex Court has held, "In complaint, place of occurrence was stated to be house, while all witnesses deposed that alleged incident occurred in field, which was the disputed land."

**State of Maharashtra Vs. Shivaji & others, Criminal Appeal No. 710 of 2004,decided on 12/08/2025,** wherein the Hon'ble Bombay High Court has held, "Testimonies of complainant and key witnesses

ambiguous, inconsistent, and lacking specificity regarding roles of accused. Caste abuse allegations made in chorus, without pinpointing any specific accused. Injuries attributed to some accused not corroborated by medical evidence. General and omnibus allegations insufficient to overturn acquittal by the trial court."

२२. आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सिद्ध होण्याकरीता आरोपींना वर्दीजबाब देणा-याची जात माहीत होती, तसे असताना वर्दीजबाब देणा-याला आरोपींनी सार्वजनिक ठिकाणी जातीवाचक शिवीगाळ करुन त्याचा अपमान केल्याचे व त्याचा अपमान करुन त्याला प्रक्षोभित केल्याचे व फौजदारीपात्र धाकदपटशा केल्याचे सरकारपक्षाने संशयरहीत शाबीत करणे आवश्यक आहे.

२३. सरकारपक्षातर्फे दिलेल्या पुराव्याचे एकत्रितपणे विचार केला असता असे दिसून येते की, दिनांक २४/०९/२०२० रोजी रात्री १०:३० वाजता घडलेल्या घटनेबाबत दिनांक २४/१०/२०२० रोजी उशिरा पोलिस स्टेशनला तक्रार दिलेली आहे. दिनांक २४/०९/२०२० रोजी पोलिस अधिक्षक, सांगली यांच्याकडे बाळाताई व तिच्या नातेवाईकांनी कोणत्या आशयाचा अर्ज दिला होता याबाबतचा उपलब्ध कागदोपत्री पुरावा तपास अधिकारी यांनी हस्तगत केला नाही व सरकारपक्षाने तो अर्ज अभिलेखावर आणण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही.

२४. अनुसुचित जाती व जमाती कायद्यातील तरतुदीनुसार सार्वजनिक दृश्य (public view) म्हणजे ज्या ठिकाणी वर्दीजबाब देणारा व आरोपी यांच्यात जातीवरून अपमान अथवा धमकी देणे असे प्रसंग घडत असताना त्याठिकाणी स्वतंत्र किंवा त्रयस्थ साक्षीदार यांनी ती घटना ऐकली किंवा पाहिली असली पाहिजे. घटनास्थळाच्या आजूबाजूला वस्ती व राहती घरे असूनही, अश्या स्वतंत्र किंवा त्रयस्थ साक्षीदारांचा जबाब नोंदविणे तपास अधिकारी यांची जबाबदारी

असून तपास अधिकारी यांनी स्वतंत्र किंवा त्रयस्थ साक्षीदारांचा जबाब नोंदविलेला नाही. सदरच्या प्रकरणात ज्या साक्षीदारांचा पुरावा सरकारपक्षाने दिला आहे ते सर्व साक्षीदार वर्दीजबाब देणाऱ्याचे जवळचे नातेवाईक व आरोपींविरुध्द ज्यांचा वाद आहे अशा साक्षीदारांचा पुरावा दिलेला आहे. अश्यापरिस्थीतीत स्वतंत्र किंवा त्रयस्थ साक्षीदारांच्या पुराव्या अभावी अनुसुचित जाती व जमाती कायद्यातील तरतुदी अन्वये आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सिदध झालेले नाहीत. त्यामुळे वर्दीजबाब देणाऱ्याने व त्याला मदत करण्याकरिता त्याच्या नातेवाईकांनी दिलेला पुरावा ग्राह्य मानून आरोपींना शासन करता येणार नाही.

**२५.** घटनास्थळ पंचनामा व वर्दीजबाब देणारा अशोक याचा जातीचा दाखला बचावपक्षाने मान्य केला असल्यामुळे त्यास निशाणी क्रमांक देण्यात आले आहेत. घटनास्थळ पंचनाम्यात घटनास्थळ हे गट क्र. ११३/१० मध्ये फिर्यादीच्या घराच्या अंगणाच्या पूर्व–उत्तर कोपऱ्यात असल्याचे नमूद केले आहे. सदरच्या जमिनीबाबत वर्दीजबाब देणारा व आरोपी यांच्यात वाद होता. आरोपी वसंत व इतर यांनी वर्दीजबाब देणारा व इतर यांचेविरुद्ध नियमित दिवाणी दावा क्रमांक २६९/२००८ (जुना क्रं. ६३/२००१) सर्व्हे क्रमांक ११३/१० मिळकतीबाबत व निरंतर ताकीद मिळण्याकरिता दाखल केला होता. सदरच्या दाव्याचा निकाल वादींचे बाजुने लागला. गट क्र. ११३/१० ही जमिन आजही वर्दीजबाब देणा–याला मिळावी असे त्याला वाटते त्यामुळे त्या जागेचे कारणावरुन व वर्दीजबाब देणाऱ्याच्या मनात आरोपींबद्दल राग होता त्यामुळे सदरचे ठिकाण घटनास्थळ दाखवून सदरची केस दाखल केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**२६.** बाळाताई हिने तिची चिखलाने माखलेली साडी व फाटलेला झंप्पर पोलीसांना दिल्याचे सांगितले आहे, परंतू बाळाताई हिची चिखलाने माखलेली

साडी व फाटलेला झंप्पर हस्तगत केले नाही असे तपास अधिकारी यांनी त्यांचे पुराव्यात सांगितले आहे. त्याचप्रमाणे बाळाताईच्या गळ्यातील मणीमंगळसूत्र पोलिसांनी जप्त केले नाही. बाळाताईच्या कपड्याबाबत व मंगळसुत्राबाबत तिने दिलेला, साक्षीदारांनी दिलेला पुरावा व तपासी अधिकारी यांनी मान्य केलेल्या बाबींवरुन त्याच्या पुराव्यात एकसुत्रता दिसून येत नाही तर विरोधाभास दिसून येत आहे. मुळात घटना दि. २४.९.२०२० रोजी घडली त्यानंतर दि. २४.१०.२०२० रोजी वर्दीजबाब दिला, त्यामुळे आक्टोबर महिन्यात केलेल्या तपासकामी पोलीसांना कोणताही मुददेमाल मिळुन आला नाही व सप्टेंबर महिन्यात बाळाताईने पोलीसांना तिची चिखलाने माखलेली साडी देण्याचा प्रश्न उपस्थीत होत नाही.

२७. वर्दीजबाब देणारा हा मांग समाजाचा आहे हे शाबीत करण्याकरिता सरकारपक्षाने वर्दीजबाब देणा–याचा जातीचा दाखला दाखल केला आहे. बचाव पक्षाने सदरचा दाखला मान्य केला आहे, यावरुन वर्दीजबाब देणारा मांग समाजाचा म्हणजे अनुसुचित जात व जमातीचा आहे ही बाब सिध्द झाली आहे. आरोपी विशाल याची जात शाबीत करण्याकरिता स्वतंत्र साक्षीदार लता हिचा पुरावा व आरोपी वसंत याचा शाळा सोडल्याचा दाखला दाखल केला आहे. तसेच आरोपी विशाल याचे नाव विठ्ठल असे असल्याचेही महाराष्ट्र शासन राजपत्र दाखल करून सिद्ध केले आहे.

२८. वर्दीजबाब देणा–याने व साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात आरोपींनी त्यांना केलेली जातीवाचक शिवीगाळ सांगितली आहे, परंतु दोनही आरोपींनी एकाच वेळी, एकाच स्वरात, एकच शब्द उच्चारले असे होण्याची शक्यता फार कमी आहे. अश्यापरिस्थीतीत बचावपक्षातर्फे दाखल केलेल्या **State of Maharashtra Vs. Shivaji & others, Criminal Appeal No. 710 of**

**2004, decided on 12/08/2025** या न्यायनिवाडयातील गुणोत्तर बचावपक्षाकरिता उपयुक्त आहे.

२९. एकंदरीत पुराव्याचे एकत्रितपणे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, ज्या अर्जाच्या आधारे साक्षीदारांनी पुरावा दिला तो मुळ अर्ज अथवा त्याची सत्यप्रत अभिलेखात दाखल नसल्यामुळे साक्षीदारांनी दिलेला पुरावा हा त्या अर्जातील कथनाप्रमाणे व दि. २४.९.२०२० रोजी घडलेल्या तथाकथित घटनेबाबतचा आहे असे म्हणता येणार नाही. तपास अधिकारी यांनी प्रत्यक्षदर्शी स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब नोंदविले नाहीत, सनीचा जबाब नोंदविला नाही व तपासकामात त्रुटी ठेवल्या आहेत. ज्या साक्षीदारांचे जबाब नोंदविले ते सर्व वर्दीजबाब देणाऱ्याचे जवळचे नातेवाईक आहेत व वर्दीजबाब देणाऱ्याच्या कथनास पुष्ठी मिळावी म्हणून त्यांनी वर्दीजबाब देणाऱ्याच्या हक्कात पुरावा दिला आहे.

३०. पोलिस अधिक्षक, सांगली यांच्याकडे दिलेल्या तक्रारी अर्जाबाबतची चौकशी करण्याकरिता वर्दीजबाब देणा–याची पत्नी व त्याचे नातेवाईक यांना दि.२४.१०.२०२० रोजी पोलिस ठाण्यात बोलविले होते असे सरकारपक्षाचे कथन असून वर्दीजबाब देणा–याची पत्नी व त्याचे नातेवाईक यांनी पोलीस अधिक्षक, सांगली यांचेकडे दिलेल्या त्या अर्जाचा एक महिन्यापर्यत कोणत्याही प्रकारे पाठपुरावा केला नाही व एक महिन्यानंतर कोणतेही संयुक्तिक कारणाशिवाय वर्दीजबाब दिला हे स्पष्ट दिसून येते. त्या दिवशी वर्दीजबाब देणाऱ्याची पत्नी बाळाताई पोलिस ठाण्यात हजर राहिली नाही व तिने स्वतः पोलिस अधिक्षक, सांगली यांचेकडे दिलेल्या अर्जाबाबत काहीही सांगितल नाही.

३१. पोलिस अधिक्षक, सांगली यांचेकडे अर्ज देण्याचे काय कारण घडले होते, याबाबत एकाही साक्षीदाराने पुराव्यात काहीही सांगितले नाही. घटना

घडल्यानंतर पोलीस स्टेशनला बाळाताई, सनी, वर्दीजबाब देणारा व बाळाताई हिचे सर्व नातेवाईक गेले होते, परंतु पोलीसांनी त्याची तक्रार घेतली नाही, असे सरकारपक्षाचे म्हणणे नाही. अश्यापरिस्थीतीत पोलीस अधिक्षक,सांगली यांचेकडे अर्ज देण्याचे काय कारण घडले होते याचाही खुलासा वर्दीजबाब देणारा, बाळाताई व साक्षीदारांनी करणे आवश्यक होते. असा कोणताही खुलासा सरकारपक्षाच्या साक्षीदारांनी केलेला नाही.

**३२.** दिनांक २४/०९/२०२० रोजी रात्री १०:३० च्या सुमारास ते रहात असलेल्या वर नमूद जागेत आरोपी वसंत बाजीराव मोरे व त्याचा मुलगा विशाल वसंत मोरे तेथे आले व म्हणाले की, "तुम्ही रहात असलेली जागा आमची आहे, तेव्हा तुम्ही येथून निघून जा, अन्यथा जेसीबी लावून रातोरात घरे पाडून टाकीन असे दि. २४.९.२०२० रोजी घडलेल्या तथाकथित घटनेबाबत वर्दीजबाब देणा-याच्या पुराव्याला दुजोरा देणारा इतर प्रत्यक्षदर्शी स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा नोंदविलेला नसल्यामुळे त्याच्या व त्याच्या जवळच्या नातेवाईकांचे पुराव्यावर विसंबून राहून आरोपींना दोषी ठरविता येणार नाही.

**३३.** वर नमुद कारणांमुळे, दि.२४.०९.२०२० रोजी रात्री १०:३० वाजता वर्दीजबाब देणा-याचे घराजवळ आरोपींनी समान उद्देश साध्य करण्याकरिता वर्दीजबाब देणा-याला किंवा त्याच्या पत्नीला, साक्षीदारांना हेतूपुरस्कर जातीवाचक शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केल्याचे, इच्छापूर्वक दुखापत पोहचविल्याचे व आगळीक केल्याचे सरकारपक्षाने संशयरहित शाबीत केले नाही. तसेच आरोपींनी वर्दीजबाब देणा-याला प्रक्षोभित करुन त्याचा अपमान केल्याचे व त्याच्यावर फौजदारीपात्र धाकटदपटशा केल्याचे सरकारपक्षाने संशयरहित शाबीत केले नाही.

**३४.** वर नमुद कारणांमुळे आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सरकारपक्षाने संशयरहीत सिद्ध केले नाहीत असा निष्कर्ष येत असल्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल. सबब आरोपींतर्फे वकीलांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य मानून व सरकारपक्षातर्फे केलेला युक्तीवाद फेटाळून मुद्दे क्रमांक १ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी देवुन मुद्दा क्रमांक ६ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र. १ वसंत बाजीराव मोरे व आरोपी क्र. २ विशाल वसंत मोरे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध सुधारीत) कायदा कलम ३(१)(r)(s) व ३(२)(व्हीए) च्या गुन्हयातुन निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींनी दिलेले वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–ए अन्वये प्रत्येकी रु.२५,०००/– जातमुचलका आरोपींनी द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला.)

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.04.04 12:52:22 +0530

**विटा.**
**दिनांक – ३०/०३/२०२६**

**(उषा वि. इंदापूरे)**
**अतिरीक्त सत्र न्यायाधीश, विटा**

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file, are same word to word, as per the original order.

Name of Stenographer : S. K. Patil (Steno Grade-I)
Court : Addl. Sessions Judge,Vita
Date of order : 30.03.2026
Signed by Presiding officer on : 04.04.2026
Uploaded on : 04.04.2026

-----